वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ ,
कृषि नगर वसमत रोड,परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| Tel. & Fax No.(02452)229755 | Web:http:www.vnmkv.ac.in | E-mail: /reg_mau@rediffmail.com reg@mkv.ac.in |
| --- | --- | --- |

वाचा : १)शासन निर्णय क्रमांक -परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या-८ दिनांक २९ फेब्रुवारी-२०१६
२) शासन निर्णय क्रमांक -परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या-८ दिनांक २२ जून,२०२१

" कृषि विद्यापीठातील अधिकारी /कर्मचारी यांचे परिविक्षाधीन कालावधी पुर्ण करण्यात आल्यानंतरच विद्यापीठाबाहेर नौकरी करण्यास / शैक्षणिक परवानगी करिता ना हरकत/ परवानगी देणेबाबत. "

परिपत्रक

जा. क्रं. २०२२/प्र.क्र.६/परिपत्रक /आस्था-८ /4934
दिनांक : २४ /११/२०२२ २५

---

प्रकरणी असे निदर्शनास आले आहे की, परिविक्षाधीन कालावधीचा निपटारा झालेला नसला तरी गट अ ते गट-ड संवर्गातील अधिकारी /कर्मचारी विद्यापीठाबाहेर नौकरीसाठी /शैक्षणिक परवानगी साठी अर्ज करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र मागणी करिता अर्ज या कार्यालयास प्राप्त होत आहेत.

सद्यस्थितीत विद्यापीठामध्ये अधिकारी /कर्मचारी यांची ५० टक्के पेक्षा जास्त पदे रिक्त आहेत, त्यामुळे अपुऱ्या मनुष्यबळावर कार्यालयीन /संशोधन /विस्तार/ शिक्षण विभागाचा कार्यभार सुरु आहे. विद्यापीठाने अत्यंत जबाबदारीने शासन धोरणानुसार मागील काळात जे कांही भरती प्रक्रीया राबविल्या आहेत, त्यामधून उपलब्ध झालेले मनुष्यबळ दोन वर्षापेक्षा कमी कालावधीत एखादा अभ्यासक्रम बहिस्त रित्या पुर्ण करण्यासाठी ते रजेचा मार्ग अवलंबतात, त्यामुळे कार्यालयीन कामे जलद गतीने होत नाहीत. विद्यापीठ सेवेत रुजू झाल्यानंतर परिविक्षाधिन कालावधीत विद्यापीठा बाहेर नौकरी करण्यास ना-हरकत मागणी करतात आणि निवड झाल्यास नौकरी सोडून संबधीत विभागात रुजू होतात यामुळे प्रत्यक्ष /अप्रत्यक्ष विद्यापीठाची शैक्षणिक संशोधनात्मक / प्रशासकीय हानी होत आहे.

सबब, वनामकृवि,परभणी विद्यापीठांतर्गत सर्व कार्यालय प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, प्रकरणी विद्यापीठाबाहेरील नौकरी करण्यास अर्ज /शैक्षणिक अर्ज भरण्यास परवानगी करिता विद्यापीठ सारसंग्रह -२०१७ (५७) अन्वये विद्यापीठाबाहेर नोकरीसाठी /उच्च शिक्षणासाठी अर्ज करण्यास परवानगी देण्याचे अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना आहेत, त्यामुळे आपल्या कार्यालयाच्या आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाला असेल अशाच अधिकारी /कर्मचाऱ्यांचे अर्ज योग्य त्या माध्यमाद्वारे सादर करण्यात यावेत. ज्या कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झालेला नाही अशा कर्मचाऱ्यांना विद्यापीठाबाहेर नोकरीसाठी /उच्च शिक्षणासाठी चाअर्ज या कार्यालयाकडे पाठविण्यात येवू नयेत याची दक्षता घ्यावी. तथापी,संबधित विभागाचे मा.संचालक यांनी आपल्या मार्फत येणाऱ्या प्रस्तावावर अंत्यत महत्वाचे अपवादात्मक किंवा जिकरीचे असेल तरच स्पष्ट अभिप्राय नमूद करुनच या कार्यालयास प्रस्ताव अग्रेषित करावे.

मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने,

( धिरजकुमार रा. कदम )
कुलसचिव

प्रतिलीपी :

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि),/संचालक संशोधन/संचालक विस्तार ,वनामकृवि,परभणी
२. नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ वनामकृवि, परभणी
३. उपकुलसचिव (आस्था / साप्रवी /विद्या ), कुलसचिव कार्यालय,वनामकृवि,परभणी

यांना देवून कळविण्यात येते की,सदरील परिपत्रक हे आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत:

१. प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि,परभणी यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करावे.
२. मा.कुलगुरु महोदय यांचे खाजगी सचिव,वनामकृवि,परभणी.